# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक १५-०३-२०१६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.</u>**

मंगळवार दिनांक १५ मार्च २०१६ रोजी (दिनांक २०-२-२०१६ रोजीची तहकूब सभा, का.प.क्र.१४) मा.महापौर,श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११-०५ वा वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.ओम प्रकाश बकोरिया,आयएएस, नगरसचिव, श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

१. स.स. श्री. प्रमोद प्रल्हाद राठोड
२. स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर
३. स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव
४. स.स. श्री.खान जहाँगीर मुलानी
५. स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू
६. स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण
७. स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग
८. स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
९. स.स. सौ.रोजतकर पुष्पा उत्तमराव
१०. स.स. श्री.विजय साईनाथ औताडे
११. स.स. श्री.सुरे सीताराम इसराम
१२. स.स. सौ.स्वाती किशोर नागरे
१३. स.स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१४. स.स. श्री.खान अय्युब म.हुसेन खान
१५. स.स. श्री.जाधव ज्ञानोबा पांडूरंग
१६. स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय
१७. स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी
१८. स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले
१९. स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद
२०. स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद
२१. स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ
२२. स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद
२३. स.स. श्री.सय्यद मतीन रशीद
२४. स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ
२५. स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी
२६. स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन

२७. स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम
२८. स.स. श्रीमती खरात सिमा गणपत
२९. स.स. सौ.शोभा नारायणराव वळसे
३०. स.स. श्री.चित्ते नितीन रमन
३१. स.स. सौ.ज्योती सुभाष पिंजरकर
३२. स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र
३३. स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी
३४. स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले
३५. स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग
३६. स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप
३७. स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव
३८. स.स. श्री.शिंदे राजु रामराव
३९. स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम
४०. स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
४१. स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम
४२. स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ
४३. स.स. श्री.अजीम अहेमद रफीक
४४. स.स. श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी
४५. स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी
४६. स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन
४७. स.स. श्री.तनवाणी राजु लेखराज
४८. स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव
४९. स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ
५०. स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
५१. स.स. श्री.एडके विकास प्रकाश
५२. स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय
५३. स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव
५४. स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम
५५. स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी
५६. स.स. श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण
५७. स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास
५८. स.स. श्री.शेख जफर अखतर
५९. स.स. श्री.जहागीरदार मोहम्मद अयुब गुलाम जिलानी
६०. स.स. श्रीमती गादगे शितल विरभद्र
६१. स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
६२. स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब
६३. स.स. श्रीमती देसरडा राखी प्रशांत
६४. स.स. श्रीमती भालेराव आशा नरेश

६५. स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत
६६. स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी
६७. स.स. श्री.बारवाल गजानन रामकिसन
६८. स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण
६९. स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर
७०. स.स. श्रीमती बनकर विजया संजय
७१. स.स. श्री.साळवी नितीन दशरथ
७२. स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल
७३. स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र
७४. स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
७५. स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास
७६. स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद
७७. स.स. श्रीमती सत्यभामा दामु अण्णा शिंदे
७८. स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव
७९. स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र
८०. स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव
८१. स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव
८२. स.स. श्री. भगवान (बापु) देविदास घडमोडे
८३. स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल
८४. स.स. श्री.सोहेल शकील शेख
८५. स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे
८६. स.स. श्रीमती साळवे अनिता मोहन
८७. स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब
८८. स.स. श्रीमती मिना रामदास गायके
८९. स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव
९०. स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम
९१. स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे
९२. स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल
९३. स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ
९४. स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर
९५. स.स. श्रीमती निकाळजे लता मगन
९६. स.स. श्री.सिद्धांत संजय शिरसाट
९७. स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद
९८. स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे
९९. स.स. श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन
१००. स.स. श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोददीन
१०१. स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे
१०२. स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे

१०३. स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी
१०४. स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे</u>**

१. श्री.शेख अब्दुल ताहेर अब्दुल करीम
२. श्री.घोडके कचरु छगनराव
३. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
४. श्री.कांबळे चेतन जनार्धन
५. श्री.चंदु किशनचंद तनवाणी

श्री.गजानन बारवाल :स्व.हरीभाऊ मिटकर तसेच स्व.मगनलालजी घोडके यांचे दु:खद निधन झाले त्यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :यास अनुमोदन आहे.

श्रीमती माधुरी देशमुख :तसेच सिध्दार्थ प्राणी संग्रहालयातील तीन वाघाच्या बिबट्यांचा मृत्यू झाला त्यांनाही श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री.अंकिता विधाते :यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर :सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

या वेळी स्व.हरीभाऊ मिटकर,स्व.मगनलालजी घोडके तसेच तीन वाघाच्या बिबट्यांना सभागृहाच्या वतीने ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

श्री.अब्दुल र.नाईकवाडी:माईक खराब आहे. दुरूस्ती करणार होते? काय कार्यवाही केली?

श्री.नंदकुमार घोडेले :नवीन मा.आयुक्त म्हणून श्री.ओम प्रकाश बकोरिया रूजू झालेले आहेत. शहराच्या विकासासाठी त्यांचे काय मत आहे? त्यांच्या भावना सभागृहाला कळू द्याव्यात. त्यांनी त्यांचा परिचय सभागृहाला देण्यात यावा.

श्री.भगवान घडमोडे :आम्ही मा.आयुक्तांच्या बरोबर आहे. महापालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने त्यांनी प्रयत्न करावे व विकास करावा.

श्री.राजेंद्र जंजाळ :तत्कालीन आयुक्त श्री.केंद्रेकर साहेबांनी चांगले उद्दिष्ट समोर ठेवून महापालिकेत काम केले. त्याच कामाची जबाबदारी नवीन मा.आयुक्त यांचेवर पडलेली आहे. प्लास्टीक कचरा निर्मुलन, रस्त्याची कामे, कच-यांची घेतलेली भुमिका याबद्दल नवीन आयुक्त यांचे मत काय आहे? ११८ सदस्य आहे काहींची ओळख मा.आयुक्तांबरोबर असेल या शहरासाठी नेमकी भुमिका मा.आयुक्तांची काय असायला पाहिजे? खुलासा करावा.

मा.महापौर :मा.आयुक्त यांनी पुणे येथे चांगले काम केलेले आहे. या शहराच्या विकास कामासाठी काय नियोजन असणार आहे. मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

श्री.अब्दुल र.नाईकवाडी:मा.श्री.केंद्रेकर साहेबांनी जसे काम केले, त्याप्रमाणे नवीन आयुक्त यांनी काम करावे. महापालिका आर्थीक संकटात आहे. उत्पन्न कसे वाढेल यासाठी प्रयत्न करावे. माईक केंव्हा दुरूस्त होणार माहिती द्यावी.

मा.आयुक्त :दोन दिवसांपूर्वी या सभागृहात व्हिजीट केली होती. माईकची चांगली व्यवस्था केली जाईल. माझे मुळ गाव मध्यप्रदेश आहे २००६ च्या बॅच मध्ये मी आयएएस आहे. गडचिरोली येथे पहिल्यांदा पोस्टींग होती, त्यानंतर अमरावती, सिधुदर्ग जिल्हा परीषदेत, जिल्हाधिकारी म्हणुन नंदुरबार, स्पोर्ट आयुक्त म्हणून काम केले. पुणे येथे अति.आयुक्त म्हणून तर आता आयुक्त म्हणून या महापालिकेत चार्ज घेतला. प्रत्येक शहरात नागरीकांची डिमांड, जनतेची अपेक्षा व या शहराची डिमांड काय आहे? याप्रमाणे काम करता येईल. उत्पन्न कसे वाढविता येईल? प्रयत्न करू. ते वाढले तर कामे करता येतील. शहरातील पाणी, रस्ते व ड्रेनेजच्या ज्या समस्या आहेत त्याकडे लक्ष देऊ. प्राप्त होणाऱ्या निधीतून शहर स्वच्छ कसे ठेवता येईल, त्यासाठी प्रयत्न करू. ही ऐतिहासीक सिटी स्वच्छ, सुंदर कशी करता येईल? त्याच बरोबर स्पोर्ट सिटी कशी करता येईल? लक्ष देऊ. तत्कालीन मा.आयुक्त श्री.केंद्रेकर यांचेही मार्गदर्शन घेऊन पुढे काम करू. त्याच बरोबर आपल्या सर्वांचा सहभाग आवश्यक आहे. त्यामुळे आणखी चांगले काम करता येईल.

श्री.राजगौरव वानखेडे :अधिकारी कर्मचारी चांगले काम करतील याकडे लक्ष द्यावे.

श्रीमती आशा निकाळजे :माझ्या वार्डात स्विकृत सदस्य श्री.चेतन कांबळे हे सहा महिन्यापासून वार्डात विकास काम करू देत नाही. नागरीकांचे प्रश्न सुटत नाही.

मा.महापौर :ही तहकूब सभा आहे नंतरच्या सभेत चर्चा घेण्यात येईल. ३७० पर्यंत प्रश्न मागिल सभेत घेण्यात आले आता ३७१ प्रश्नावर बोलावे.

प्रश्न क्रमांक ३७१ :स.श्रीमती सायरा बानो खान

श्री.नासेर सिध्दीकी :चेलीपुरा भागात हर्षनगर मध्ये महापालिकेचे सभागृह आहे तेथे अतिक्रमण झाले ते केव्हा हटविणार आहे.

प्रशासकीय अधिकारी :या ठिकाणी अतिक्रमण झाले आहे. असे मालमत्ता विभागाने सादर केल्यानंतर कार्यवाही केली जाईल. मालमत्ता अधिकारी यांना पत्र दिलेले आहे.

श्री.फेरोज खान :माझ्या वार्डातही अतिक्रमण आहे. ९ महिने झाले. कार्यवाही होत नाही.

प्रशासकीय अधिकारी :तेथे अतिक्रमण आहे. असे मालमत्ता अधिकारी यांनी खुलासा केला. तर कार्यवाही करता येईल.

मालमत्ता अधिकारी :या ठिकाणी आजच्या आज जाऊन पाहणी करून कार्यवाही केली जाईल.

मा.महापौर :आजच्या आज तेथे जाऊन पाहणी करावी कार्यवाही करावी.

श्री.अब्दुल र नाईकवाडी:पाच प्रश्न दिले होते चारच प्रश्न आले. डेव्हलपमेंन्ट प्लॅन्ट विषयी प्रश्न होता. जुन्या विकास आराखडयानुसार अनेक रस्ते क्रॉस केले माहिती विचारली दिली नाही. तो प्रश्न आला नाही.

मा.महापौर :काही प्रश्न थांबवावे लागतात. डेव्हलपमेंन्ट प्लॅन संबधी मा.कोर्टात मॅटर आहे. सहा.संचालक नगररचना यांनी स.सदस्य यांना माहिती द्यावी.

प्रश्न क्रमांक ३७३ :

श्री.अब्दुल र.नाईकवाडी :मी प्रश्न दिला होता ४ महिने झाले पत्र दिले उत्तर मिळाले नाही.

कक्ष प्रमुख-घनकचरा :वार्ड अधिकारी यांनी माहिती दिली आहे.

मा.महापौर :आज सध्याकांळ पर्यत स.सदस्यांना माहिती दयावी.

मा.आयुक्त :आज माहिती दिली जाईल. जे प्रश्न सदस्यांचे येतील. त्या बाबत प्रत्येक आठवड्यात माहिती घेणार आहे. वेळीच उत्तर जे अधिकारी देणार नाही. त्यांचेवर कार्यवाही केली जाईल.

प्रश्न क्रमांक ३७४ :

श्री.अब्दुल र नाईकवाडी :या प्रश्नाच्या संदर्भात माहिती विचारली होती श्री.नाईकवाडी यांचे आदेशानुसार नमूद करून संबंधीतास नोटीस काढली, हे योग्य आहे का? दिनांक ०१.०८.२०१५ रोजी पत्र दिले. आजपर्यत कार्यवाही केली नाही. मार्कीग करून नगर रचना विभागाने दिल्यास कार्यवाही करू असे म्हटले. माझ्या माहिती प्रमाणे तीन दिवसांपुर्वी नगर रचना विभागास पत्र दिले.

प्रशासकीय अधिकारी :मालकी हक्काची नोटीस दिली आहे. या संदर्भामध्ये स.सदस्यांचे नाव नजर चुकीने टाकले गेले. नोटीसचे कोणतेही उत्त्तर दिले नाही नगर रचनाला मार्कीग करण्या बाबत पत्र दिले. मार्कीग केल्यास अतिक्रमण काढले जाईल.

श्री.रेणुकादास वैद्य :गजानन महाराज मंदीर रस्त्यावर माठ, कुंडयावाले बसतात. अतिक्रमण काढले होते पुन्हा झाले ते काढावे.

श्री.वानखेडे राजगौरव :एन-१२ मध्ये माझे नातेवाईक आहेत. त्यांचा मिळकतीचा वाद आहे. ज्यांचा वाद त्यांचे पजेशन, ओनरने मनपाचे कर्मचारी हाताशी घेऊन भाडेकरूला नोटीस दिली, की मालकी हक्काचे कागदपत्र द्या. विचारणा केली असता चुकीने झाले, असे म्हटले. पैसे घेऊन काहीही काम कर्मचारी करीत आहे. अतिक्रमण विभागातील इमारत निरीक्षक यांची बदली करावी.

श्री.अफसर खान :यापुर्वी मी पत्र दिले विद्यापीठ गेट ते मकईगेट रस्त्यावर ५-५ फुट पुढे अतिक्रमण केले. अधिकारी सदस्यांनी पत्र दिले. कार्यवाही करायची असे नागरीकांना सांगतात. ते नागरीक आमच्याकडे येतात. अशा प्रकारे अधिकारी काम करीत असेल तर कार्यवाही करावी. ८ महिन्यामध्ये अतिक्रमण काढले नाही. १०-१२ फुटाची गल्ली, तेथेही अतिक्रमण केले. कार्यवाही करीत नाही.

श्री.राजू शिंदे :अतिक्रमण करा असा विभाग आहे असे वाटते. जेवढे अतिक्रमण झाले त्यास अतिक्रमण विभागाची जबाबदारी येते.

श्री.फेरोज खान :माझ्या वार्डात दोन ओपन स्पेसवर माजी नगरसेवकाचा ५ वर्षा पासून कब्जा आहे. ९ महिन्यापासून पाठपुरावा करतो. कार्यवाही होत नाही. जालना रोडवर १०-१० मजली इमारतीचे अनधिकृत काम चालू आहे या

संदर्भात मा.आमदार यांनी महापालिकेस पत्र व फोटो दिले. तरीही कार्यवाही होत नाही. पैसे घेऊन तेथील काम चालूच ठेवले जाते का?

श्री.रामेश्वर भादवे :गांधीनगर जवळील नाल्यावर बांधकाम चालू आहे. सहा महिन्यापासून बोलतो कार्यवाही होत नाही.

श्री.नंदकुमार घोडेले :अतिक्रमणाबाबत मा.महापौर आपल्या दालनात बैठक घ्यावी. निर्णय घ्यावा.

या वेळी डायस समोर स.सदस्य मोठमोठ्याने बोलत असतात.

मा.महापौर :महापालिकेच्या जागेवर अतिक्रमण होते अधिकारी कार्यवाही करीत नाही मा.आयुक्तांनी याकडे लक्ष द्यावे.

प्रशासकीय अधिकारी :स.श्री.फेरोज खान यांचे प्रश्नांच्या संदर्भात नगर रचना कडे संचिका मेजरमेंन्टसाठी पाठवली. त्यावर योग्य अभिप्राय आल्यानंतर कार्यवाही होईल.

श्री.अफसर खान :पुर्वी मी ज्या वार्डातून निवडून आलेलो होतो. तेथे एका इमारतीचे रस्त्यावर ३ फुट पुढे बांधकाम चालू होते. तेंव्हाच संबंधीत विभागात मी पत्र दिले. नागरीकांनीही तक्रारी दिल्या. माहिती दिली. आपले कर्मचारी तेथे येतात, बोलणे होते, कार्यवाही होत नाही. आज रोजी तीन मजली इमारत तेथे उभी आहे.

श्री.फेरोज खान :कटकट गेट नाल्याचे आठ महिन्यापासून मार्कींग बंद आहे. मा.आमदार श्री.इम्तीयाज जलील यांनीही पत्र दिले. कार्यवाही होत नाही, रूंद असलेला नाला आता नाली झाली.

प्रशासकीय अधिकारी :गांधी नगर येथील सुरूवातीला स्थळ पाहणी केली. ती जागा नाल्याची की खाजगी आहे? नगर रचना विभागाने पाहणी केली. पेपर मागविले. ती खाजगी मालकीची जागा आहे. संबंधीतास १५ दिवसांची नोटीस दिली आहे.

श्री.रामेश्वर भादवे :संबंधीताने बांधकामाची परवानगी घेतली का?

श्री.रेणुकादास वैद्य :मनपाच्या बाजूला नाला आहे. तेथे भुमीगत गटार योजनेचे काम चालू आहे. भविष्यात त्या जागेवर इमारती होतील, आताच काळजी घ्यावी. ते पाईप दिसायला पाहिजे.

श्री.नासेर सिद्यीकी :शहागंज चमन जवळ अनधिकृत पार्कीग झालेली आहे. फिस वसूल करीत आहे.

मा.महापौर :मा.आयुक्त यांनी अतिक्रमणाच्या संदर्भात अधिका-यांची बैठक घेऊन अतिक्रमणाचे संबंधीत जे प्रश्न असतील ते सोडवावे.

प्रशासकीय अधिकारी :जालना रोड, चंम्पा चौक येथील अतिक्रमण काढले. योग्य प्रकारे मी विभागात काम करीत आहे.

मा.महापौर :गांधीनगर नाल्यावरील अतिक्रमण किंवा अनधिकृत बांधकाम असेल तर कार्यवाही करण्यात यावी.

श्री.अब्दुल र.नाईकवाडी:माझे नाव टाकून संबंधीतांना नोटीस दिली जाते. नगर रचना विभागाचा अभिप्राय आल्यावर कार्यवाही करू असे सांगतात. कार्यवाही करीत नाही.

श्रीमती ज्योती अभंग :हर्सुल पाणी फिल्टरला लागून भिंत आहे. तेथून किती फुटानंतर काम करू शकतात? बाजूलाच लगत स्लॅब टाकलेला आहे. जागा सोडली नाही. इमारत निरीक्षक यांना सांगितले. कार्यवाही केली नाही.

सहा.संचालक न.र :१० फुट सोडून बांधकाम असायला पाहिजे.

मा.महापौर :संबंधीत स.सदस्यांनी बी.आय.ला फोन केला बांधकाम काढले नाही. प्रशासकीय अधिकारी म्हणून बी.आय.वर काय कार्यवाही करणार आहे.

प्रशासकीय अधिकारी :भिंतीला लागून बांधलेल्या घराचा सर्वे करण्यात येईल. बी.आय.ने मला कल्पना दिली नाही. बी.आय.वर शिस्तभंगाची कार्यवाही केली जाईल.

श्री.राजगौरव वानखेडे :शिस्तभंग मध्ये काय कार्यवाही करता येते?

प्रशासकीय अधिकारी :कारणे दाखवा नोटीस देणे, विभागीय चौकशी करणे, निलंबीत करणे यात येते.

मा.महापौर :संबंधीत बी.आय.ला तात्काळ सदर ठिकाणी पाठवून कार्यवाही करावी.

श्री मनोज गांगवे :वार्ड ८७ म्हाडा कॉलनी एअर पोर्टला लागून भाग येतो. रोडवरील ग्रीनबेल्टचे अतिक्रमण काढले होते. त्या टपऱ्या पाठीमागे बसल्या. त्यामागे झोपड्या झाल्या. माहिती दिली असता अधिकारी सांगतात की, ती जागा खाजगी आहे. १००-१५० झोपड्या झाल्या आहे. बसलेले लोक अनधिकृत आहे हे अतिक्रमण काढले जात नाही.

श्री.भगवान घडमोडे :विमानतळ ते जालना रोड वरील अतिक्रमण काढले. पुन्हा टपऱ्या काढल्या झाल्या. त्या लोकांना सांगतात की, नगरसेवकांना भेटा. आमचे नाव सांगून कार्यवाही करीत नाही. टपऱ्या समोर वाहने उभी राहतात. अपघात होऊ शकतो. रामनगरच्या स्टॉपवर अनेक टपऱ्या आहे काढल्या जात नाही.

श्री.अयुब जहागीदार :एका ठिकाणी अनधिकृत बांधकाम चालू होते. प्रशासकीय अधिकारी व श्री.अजमत खान यांना कल्पना दिली. पाच महिने कार्यवाही केली नाही. तेथे १० हजार स्क्वे.फुटावर घर झाले. कोर्टाकडून स्टे आणला, तोही दुसऱ्या सर्वे नंबरचा आणला. तेथील घर तोडून दुसऱ्याच्या जागेवर घर बांधले जात असेल तर अधिकारी कार्यवाही का करीत नाही? जे गरीब लोक आहे त्यांचे घरावर बुलडोजर घालतात. जेथे आर्थीक व्यवहार होतात तेथे कार्यवाही होत नाही. राममंदीर ते अझाद चौक रस्त्यावर ज्यांना मोबदला दिला ते लोक पुन्हा अतिक्रमण करून बसलेले आहे. ५.३५ गुंठे जमीन घेतली होती. त्या लोकांना पैसे दिले. त्यांनी कोर्ट प्रकरण केले व पुन्हा २.१७ गुंठे जमिन दिली गेली. ३.१७ गुंठे जमिन महापालिकेची ५० कोटीची जमिन आहे. त्यावर अतिक्रमण केले. तार फिन्सींग करावे मोजणी करीत नाही. पाच महिने पासून मुद्दा मांडतो कार्यवाही होत नाही. मोठमोठ्या लोकांनी केलेले अतिक्रमण हटवावे.

| | |
|---|---|
| | कटकट गेट जवळील २० फुटाचा नाला आहे नाली केली. मार्कींग करावी जागा. ताब्यात घ्यावी. |
| श्री.राजू शिंदे | :बी.आय.बदलावे अतिक्रमणावर खूप चर्चा करता येईल वेळ कमी आहे. जे अतिक्रमण झाले त्यास अतिक्रमण विभागाचे कर्मचारी बी.आय. जबाबदार आहे. एक बी.आय. ५० हजार दररोजचे कमवितो सरसकट सर्व ठिकाणचे अतिक्रमण काढावे. |
| मा.महापौर | :अतिक्रमणा संबंधीत ज्या ज्या सदस्यांनी पत्र दिले. पुन्हा एक पत्र सदस्यांनी मा.आयुक्तांना द्यावे. मला प्रत द्यावी या विषयावर आपण बैठक घेऊ. |
| श्री.राजू शिंदे | :मा.आयुक्तांनी अधिकारी/कर्मचारी यांची बैठक आयोजित करावी. शहराचा आढावा घ्यावा. |
| श्री.नंदकुमार घोडेले | :सुट्टीच्या दिवशी जास्त प्रमाणात अनधिकृत बांधकाम होते. या दिवशीही हा विभाग सुरू असावा. तसे नियोजन करण्याचे प्रशासनाला आदेशीत करावे. |
| मा.महापौर | :भुमिगत गटार योजनेचे काम होण्यासाठी नाल्यावर असलेले अतिक्रमण काढावेच लागणार आहे. तसे या लाईनचे काम होणार नाही. |
| श्रीमती मनीषा मुंडे | :जयभवानी नगर, चौक शिवाजी महाराज पुतळ्याजवळ हातगाड्या, टपऱ्या इतर अतिक्रमण झालेले आहे. |
| मा.उपमहापौर | :शहानुरमिया दर्गा जवळ फुटपाथवर लोक बसतात. अद्याप काढले नाही. जयभवानीनगर चौक लोक बसतात नियमीत लक्ष द्यावे. टपऱ्या हातगाड्या उभ्या असू नये. |
| प्रशासकीय अधिकारी | :दोनच टिम आहे. नियमीत अतिक्रमण काढण्याचे काम केले जाते. |
| प्रश्न क्रमांक ३८१ | :स.श्रीमती सरवत बेगम आरेफ हुसैनी |
| श्री.रेणुकादास वैद्य | :हा एका वार्डाचा प्रश्न नाही. अनेक ठिकाणचे वर्कऑर्डर झाल्या. काम होत नाही. ज्यांना काम दिले. ती एजन्सी काम करीत नसेल तर लोयस्ट एजन्सीला काम देण्यात यावे. पॉलीसी डिसीजन आहे. निर्णय घ्यावा. |
| शहर अभियंता | :स्पील ओव्हरची जी कामे आह, त्याची यादी करणार आहे. बील मिळत नाही म्हणून कामे ठेकेदार करीत नाही. ३० टक्के पेमेंन्ट देणार आहे वर्क ऑर्डर झाल्या. ते कामे सुरू करणार आहे. |
| श्रीमती विमल केंद्रे | :माझ्या वार्डात ६ महिन्यापासून काम होत नाही. |
| मा.महापौर | :३० टक्के पेमेन्ट दिले व काम सुरू केले नाही. तर त्यांना प्रत्यक्ष बोलवावे निर्णय घ्यावा. त्यांचेकडून काम करून घ्यावे. |
| श्री.अफसर खान | :स्पीलचे वर्क ऑर्डर झाले नाही, ती कामे करायची नाही, असे ठरले होते. जे चालू आहे तीच कामे करावी. |
| श्री दिलीप थोरात | :जे आवश्यक वाटत नाही ती कामे रद्द करावी. जी कामे चालू आहे. ती पुर्ण करावी. |

श्री.राजू शिंदे :डिफरचे पाच वर्षापासून काम चालू आहे. ८ कोटीचे काम बाकी आहे अद्याप होत नाही.

शहर अभियंता :स.श्री.राजू शिंदे यांचे वार्डातील कामे प्रगती पथावर चालू आहे २-३ दिवसात कामे सुरू होतील.

श्रीमती ज्योती नाडे :माझ्या वार्डात स्मशानभुमीची भिंत पडली वर्क ऑर्डर झाली काम होत नाही.

श्रीमती सरवत बेगम :वार्ड २४ मध्ये २०१३ ला वर्क ऑर्डर झाली. काम का होत नाही. एजन्सी काम करीत नसेल तर प्रशासन काय कार्यवाही करणार आहे.

शहर अभियंता :स्पीलच्या कामाची माहिती घेतली. स.सदस्यांशी समन्वय साधून माहिती घेतली. ३-३ वर्षापासून वर्क ऑर्डर आहे काम होत नाही.

श्री.राजू शिंदे :माझ्या वार्डात एमआयडीसी भागातून दरवर्षी एलबीटी व करातून ७५ कोटी रूपये मिळतात. टॅक्स मधून ४-५ कोटी मिळतात. ४० वर्षात काहीही काम केले नाही. रस्ते व लाईट सुविधा द्याव्या लागतात. तेथील १४ कि.मी. रस्ते केले. शहरात ४०-२४-२० कोटीचे रस्ते झाले. परंतु सन-२०११ मध्ये जे रस्ते मंजूर केले होते. त्या रस्त्याची कामे अद्याप केली नाही. भविष्यात हा खर्च वाढत जाणार आहे.

श्री.नासेर सिद्दीकी :जुन्या शहरातील रस्त्यासाठी बजेट मध्ये तरतूद करावी.

शहर अभियंता :या प्रश्नानुसार या वार्डातील काम हे लोयस्ट एजन्सीशी चर्चा करून कार्यवाही केली जाईल.

श्री.अब्दुल र.नाईकवाडी:टेंडर न झालेले काम रद्द करावे.

श्री.अब्दुल मं. नाविद :माझा वार्ड राहूल नगर भागात जुने स्पील ओव्हरची कामाची वर्क ऑर्डर झाली कामे होत नाही. मी ८ महिन्यापूर्वीच पत्र दिले. काही वार्डात कामे चालू आहे. माझ्या वार्डातच काम का होत नाही?

शहर अभियंता :मार्च अखेर पर्यंत बरीच वार्डातील कामे सुरू होतील.

श्रीमती अर्चना निळकंठ :जयविश्वभारती कॉलनीत रस्त्याचे एक वर्षापासून काम होत नाही

मा.महापौर :ज्या स.सदस्यांना प्रश्नाचे उत्तर मिळाले तर त्यावर जास्त चर्चा करणे संयुक्तीक नाही.

प्रश्न क्रमांक ३८२ :

श्रीमती सरवत बेगम :शहाबाजार येथील ए-वनची कामे का बंद झाली.

मा.महापौर :सर्व सदस्यांना स.पदाधिकारी यांना विश्वासात घेऊन हा निर्णय प्रशासनाने घेतला होता.

प्रश्न क्रमांक ३८३ :

श्रीमती सरवत बेगम :(प्रश्न वाचून दाखवितात) ८ महिन्यापूर्वी पत्र दिले. नाल्यात घाण साचली बाजूला वस्ती आहे. कचरा जमा झालेला आहे. नागरीकांचे आरोग्य धोक्यात आहे. तरी ही कामे होत नाही.

मा.महापौर :पुर्ण शहरातील नाले साफसफाई करण्या बाबत विचार होईल त्यात हा नालाही घेतला जाईल.

प्रश्न क्रमांक ३८४ :

मा.महापौर :अतिक्रमणाचा विषय आहे. यावर बैठक आयोजित करणार आहोत.

श्री.गंगाधर ढगे :मागिल बैठकीत नक्षत्रवाडी येथील ५४ व ५५ क्रमांकाचे भुंखडावर होत असलेले बांधकाम विषयी चर्चा केली होती. त्या बिल्डरने प्लॉट रिकामे ठेवून नाल्यावर बाधकाम केले. काय कार्यवाही केली उत्तर मिळाले नाही.

सहा.संचालक न.र :आदेश दिल्या प्रमाणे स्थगिती दिली आहे.

श्री.ंगंगाधर ढगे :स्थगिती नाही आज ही काम चालू आहे. सहा महिन्यापासून मागणी करतो. नाल्याच्या बाजूला भिंत करायला पाहिजे. परवानगी देतांना दिले. परंतु नाल्यावरच इमारत होत आहे.

प्रशासकीय अधिकारी :परवानगी दिली आहे. पुन्हा फेर पंचनामा करून कार्यवाही होईल. सदरील काम थांबविण्यात येईल. त्यानंतरही काम सुरू ठेवले तर संबंधीतांविरूध्द एफआयआर दाखल करण्यात येईल.

**विषय क्रमांक ३०१:-** **(शहर अभियंता)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/प्र.क्र.२४९/नवि-३४, दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे बाबत.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/प्र.क्र.२४९/नवि-३४, दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे बाबतच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३०२:-** **(शहर अभियंता)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिडको एन-७, अयोध्यानगर येथील खुल्या जागेत बऱ्याच वर्षापूर्वी बांधण्यात आलेले लोखंडी शेड असून मोडकळीस आलेले आहे. सदर शेड जोरात हवा आल्यानंतरही हालते त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सदर शेडवर मोठ्या प्रमाणात कचरा साठलेला असून शेडमध्ये मद्यपी लोक रात्री उशिरापर्यंत बसतात. त्यामुळे परिसरातील नागरिक त्रस्त झालेले आहेत. सदर शेडचा नागरिकांना कोणताही उपयोग होत नसल्यामुळे सदर शेड काढून टाकण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

त्यानुसार सदरचे मोडकळीस आलेले अस्तित्वातील शेड काढून टाकणेचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभे समोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको एन-७, अयोध्यानगर येथील खुल्या जागेत मोडकळीस असलेला शेड काढून टाकण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ३०४:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३८ एम.आय.डी.सी. चिकलठाणा या प्रभागातील कामासाठी अर्थसंकल्प तरतुद खालील दर्शविल्याप्रमाणे वळती करण्यासंबंधीचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्प पा.नं. व अ.क्र. | कामाचे नाव | सुधारित कामाचे नाव |
|---|---|---|
| शहरी भागात पुनर्डांबरीकरण करणे,एस.सी.आर. वॉर्ड-बी पा.नं.११ अ.क्र.३ | एम.आय.डी.सी. चिकलठाणा अंतर्गत येथे विविध ठिकाणी डांबरीकरण करणे. र.रु.४०.०० लक्ष | १) वॉर्ड क्र.३८ अंतर्गत एन-१ सिडको सेक्टर एफ येथील रस्त्याचे व्हाईट टॉपींग पध्दतीने कॉंक्रीटीकरण करणे र.रु.३०.०० लक्ष.<br>२) वॉर्ड क्र.३८ अंतर्गत एन-१ सिडको सेक्टर-सी येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे र.रु.१०.०० लक्ष |
| महानगरपालिकेच्या सर्व शाळा,दवाखाने व इतर इमारती देखभाल दुरूस्ती एस.सी.आर.वॉर्ड-बी पा.नं.१२ अ.क्र.१ | वॉर्ड क्र.३८ मसनतपुर अशोकनगर मनपा शाळा दुरूस्ती व शौचालय बांधणे र.रु.२०.०० लक्ष | वॉर्ड क्र.३८ अंतर्गत एन-१,सिडको येथे डॉ.शामाप्रसाद मुखर्जी उद्यानात पायगुडा तयार करणे, र.रु.५.०० लक्ष |
| जलनिःसारण देखभाल दुरूस्ती एस.सी.आर. वॉर्ड-बी पा.नं.१२ अ.क्र.२ | वॉर्ड क्र.३८ अशोकनगर मसनतपुर नाल्याची दुरूस्ती करणे व नवीन नाल्या बनविणे र.रु.२०.०० लक्ष | वॉर्ड क्र.३८ अशोकनगर मसनतपुर येथील विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे र.रु.२०.०० लक्ष |

सुचकः- श्री.राजु रामराव शिंदे अनुमोदकः-श्री.गोकुळ संपतसिंग मलके

मा.महापौर :-विषय मंजूर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३८ एम.आय.डी.सी. चिकलठाणा या प्रभागातील कामासाठी अर्थसंकल्प तरतुद खालील दर्शविल्याप्रमाणे वळती करण्यास मंजुरी देण्यात येते.

| अर्थसंकल्प पा.नं. व अ.क्र. | कामाचे नाव | सुधारित कामाचे नाव |
|---|---|---|
| शहरी भागात पुनर्डांबरीकरण करणे,एस.सी.आर. वॉर्ड-बी पा.नं.११ अ.क्र.३ | एम.आय.डी.सी. चिकलठाणा अंतर्गत येथे विविध ठिकाणी डांबरीकरण करणे. र.रु.४०.०० लक्ष | १) वॉर्ड क्र.३८ अंतर्गत एन-१ सिडको सेक्टर एफ येथील रस्त्याचे व्हाईट टॉपींग पध्दतीने कॉंक्रीटीकरण करणे र.रु.३०.०० लक्ष.<br>२) वॉर्ड क्र.३८ अंतर्गत एन-१ सिडको सेक्टर-सी येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे र.रु.१०.०० लक्ष |
| महानगरपालिकेच्या सर्व शाळा,दवाखाने व इतर | वॉर्ड क्र.३८ मसनतपुर अशोकनगर मनपा शाळा | वॉर्ड क्र.३८ अंतर्गत एन-१,सिडको येथे डॉ.शामाप्रसाद मुखर्जी उद्यानात पायगुडा |

| | | |
|---|---|---|
| इमारती देखभाल दुरूस्ती एस.सी.आर.वॉर्ड-बी पा.नं.१२ अ.क्र.१ | दुरूस्ती व शौचालय बांधणे र.रु.२०.०० लक्ष | तयार करणे, र.रु.५.०० लक्ष |
| जलनिःसारण देखभाल दुरूस्ती एस.सी.आर. वॉर्ड-बी पा.नं.१२ अ.क्र.२ | वॉर्ड क्र.३८ अशोकनगर मसनतपुर नाल्याची दुरूस्ती करणे व नवीन नाल्या बनविणे र.रु.२०.०० लक्ष | वॉर्ड क्र.३८ अशोकनगर मसनतपुर येथील विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे र.रु.२०.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३०५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३७ बकाल गल्ली (स्वामी समर्थनगर) व सावित्रीबाई फुलेनगर ह्या दोन दलित वस्ती घोषित असून या भागात मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी रक्कम रुपये ५० लक्ष उपलब्ध करुन देण्यात यावे. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

सुचकः- श्रीमती वैशाली कारभारी जाधव अनुमोदकः- श्री.सोहेल शकील शेख

मा.महापौर :विषय मंजुर. नियमाने कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.३७ बकाल गल्ली (स्वामी समर्थनगर) व सावित्रीबाई फुलेनगर या दोन वसाहतीत दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी रक्कम रुपये ५० लक्षचा निधी उपलब्ध करून देण्याकरीता नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३०६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सद्यस्थितीत शहराची लोकसंख्या १५ लाखाच्यावर आहे. एवढ्या मोठ्या लोकसंख्येला शहर बस सेवा देणे परिवहन महामंडळास शक्य होत नाही. त्यामुळे शहरातील असंख्य नागरीक या गैरसोयीबद्दल नाराजी व्यक्त करीत आहेत. बऱ्याच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना व शाळेतील विद्यार्थ्यांनाही गैरसोयीस समोरे जावे लागत आहे. सार्वजनिक व्यवस्था ही शहरासाठी अत्यंत आवश्यक आहे. यापूर्वी महानगरपालिकेमार्फत खाजगी संस्थेमार्फत शहर बस सेवा उपक्रम राबविण्यात आला. परंतु काही तांत्रिक कारणामुळे सदर परिवहन व्यवस्था बंद झाली व त्यानंतर परिवहन महामंडळाकडुन शहरात बससेवा सुरु झाली, जी की, आज अपुरी पडत आहे.

करीता महानगरपालिकेने खाजगी संस्थेमार्फत शहर बससेवा सुरु करुन नागरीकांची होणारी गैरसोय दुर करावी, यासाठी आवश्यक कार्यवाही प्रशासनाने पूर्ण करुन शहरात लवकरात लवकर बस सेवा सुरु करणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचकः-** श्री.दिलीप गंगाधर थोरात, **अनुमोदकः-** श्री.गजानन भानुदास मनगटे

**संवादः-**

श्री.दिलीप थोरात : शहरात एएमटी बस बंद झाल्या पासून नागरीकांचे हाल होत आहे.व सध्या परीवहन विभागाच्या मार्फत सिटीबस सुरू आहे त्यात नियोजन नाही. नागरीकांची मागणी लक्षात घेता हा प्रस्ताव मंजूर करावा.

श्री.रेणुकादास वैद्य :या शहर बस चालू केली त्याबद्दल मा.श्री.दिवाकरजी रावते यांचे अभिनंदन करावे. यापुर्वी एएमटी मार्फत बस सेवा सुरू केली होती त्यात काय त्रुटी होत्या. त्यावर अभ्यास करूनच या प्रस्तावानुसार विचार व्हावा.

श्री.अफसर खान :यापुर्वी एएमटी बस सेवेत महापालिकेचे किती नुकसान झाले व ती बस सेवा बंद का केली? सर्व माहिती व सभागृहाला विश्वासात घेऊन योग्य निर्णय यावर व्हावा.

श्री.गंगाधर ढगे :त्यावेळी ठेकेदाराचा फायदा व मनपाचे नुकसान झाले. आता जो विषय आला यावर सर्व विचारविनिमय होऊन योग्य निर्णय घ्यावा.

श्री.नासेर सिद्दीकी :शहरात सिटीबस कमी पडत असेल तर संबंधीत विभागाकडून जास्तीच्या बसेस मागणी करू शकतो.

श्री.नंदकुमार घोडेले :हा विषय मंजूर करण्यास हरकत नाही.

श्री.अफसर खान :चर्चा करून योग्य निर्णय व्हावा. महापालिकेचे नुकसान होऊ नये मंजूर करण्यास विरोध नाही.

या वेळी स.सदस्य डायस समोर येऊन एकाच वेळी बोलत असतात.

श्री.गंगाधर ढगे :यावर सविस्तर चर्चा करून निर्णय व्हावा. तुर्त स्थगिती दयावी.

श्री.नंदकुमार घोडेले :यापुर्वी अकोला प्रवासी बस सेवा सुरू करण्याचा प्रयोग झाला होता. ती बससेवा बंद पडली त्यामूळे नागरीकांना मोठा त्रास झाला.आधीच्या बस सेवा सुरू करतेवेळी काय त्रुटी राहिल्या होत्या. त्याचा विचार करून प्रशासनाने अभ्यास करून सविस्तर माहितीसह प्रस्ताव प्रशासनाच्या मार्फत समोर यावा. चांगली एजन्सी नेमली पाहिजे. पुर्वीच्या एएमटी बस संस्थेकडून जी रॉयल्टी मिळायला पाहिजे ती मिळाली नाही. प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. या विषयी कायदेशीर सल्ला घेऊन योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.अफसर खान :प्रशासनाच्या मार्फत यावे पुर्वीच्या बस सेवा बंद पडली. किती नुकसान मनपाचे झाले? मा.न्यायालयातील परीस्थिती काय सर्व माहितीसह यावे.

श्री.राजगौरव वानखेडे :१५ लक्ष लोकसंख्या शहराची आहे बस सेवा अकोला प्रवासी वाहतूक संस्थेला दिले त्यांचे व महापालिकेचे जॉईन्ट अकाऊंट होते नंतर एजन्सीचे स्वतंत्र अकाऊंट करून दिले त्यामूळे बस सेवेला गळती लागली. त्यावेळी काय त्रुटी राहिल्या. त्याचा विचार करून प्रस्ताव घेण्यात यावा.

श्री.भाऊसाहेब जगताप :पुर्वी खाजगी एजन्सीला बस सेवा चालवायला दिली होती. तेंव्हा किती नुकसान झाले.

श्रीमती अर्चना निळकंठ :पुरेशी बस सेवा शहरात नसल्याने महिलाना मोठा त्रास सहन करावा लागतो. रिक्षावाले नागरीकांची लूट करीत आहे.बस सेवा सुरू केल्यास प्रदुषणही कमी होईल. हा प्रस्ताव मंजूर करावा.

श्री.राजू शिंदे :यापुर्वी खाजगी एजन्सीला बस सेवा दिली. काही काळ चांगल्या प्रकारे चालू होती. जेव्हा स्वतंत्र अकांऊट ओपन करण्यास मा.आयुक्तांनी

परवानगी दिली. त्यानंतर एजन्सीने महापालिकेला पैसा भरणा केला नाही. या योजनेला महापालिका गॅरेंटर होते. त्यामूळे बस सेवा बंद पडली. या प्रस्तावानुसार बस सेवा सुरू करतांना मनपाचे नुकसान होणार नाही. काहीही जबाबदारी न घेता सुरू करावी किती उत्पन्न मिळणार हे समोर यावे तरच विषय मंजूर करावा. नागरीकांना बस सेवा असावी ती चालू व्हावी. आमची इच्छा आहे. या योजनेवर मा.आयुक्ताचे कन्ट्रोल असावे.

श्री.गंगाधर ढगे :अपंग, विद्यार्थी, वयोवृध्द यांना सवलत दिली पाहिजे. सर्व पदाधिकारी यांची नियत्रंण कमेटी असावी.

श्री.अजीम अहेमद :पुर्ण शहरात बस सेवा सुरू व्हावी.

श्री.जमीन कादरी :शहरातील रस्ते व्यवस्थीत करावे त्यानंतर बस सेवा सुरू करावी प्रशासनाकडून प्रस्ताव यावा.

श्री.भगवान घडमोडे :आज घडीला शहरात बस सेवा अपुरी पडत आहे. प्रस्ताव मंजूर करावा. पुर्वी प्रयोग केला तो फसला तेंव्हा प्रशासनाने परस्पर एजन्सीला अकाऊंट ओपन करण्याची परवानगी दिली. जी रॉयल्टी मिळणार होती ती मिळाली नाही. त्यामुळे एजन्सीने गैरफायदा घेतला व बस सेवेला गळती लागली. करारनामा व्यवस्थीत होणे आवश्यक आहे. याची काळजी घ्यावी. वेळोवेळी सभागृहाला माहिती दिली जावी. आयुक्तांना अधिकार दिले म्हणून परस्पर एजन्सीला खाते उघडण्याची परवानगी दिली. त्यामूळे चांगला प्रोजेक्ट बंद पडला, योग्य प्रकारे करारनामा करावा ही बस सेवा सुरू करावी.

श्री.सिद्यीकी नासेर :प्रशासनाकडून प्रस्ताव यावा. रस्ते चांगले करावे पुर्ण शहरात बस सेवा असावी.

श्री.कैलास गायकवाड :एजन्सीच्या बसेस जुन्या होत्या. अचानक बंद पडणे, असे प्रकार होत असे. त्यामूळे नागरीकांना त्रास सहन करावा लागला. आता एजन्सीला काम देतांना नवीन बस त्या पुर्ण तपासणी करून घ्याव्यात. त्यानंतरच करारनामा करावा. चांगला प्रस्ताव आहे मंजूर करावा.

श्रीमती माधुरी देशमुख :ज्यांनी प्रस्ताव ठेवला त्यांचे स्वागत व अभिनंदन, महिलांना बस सेवेची गरज आहे. बस सेवा त्वरीत सुरू करावी. मागे जे झाले ते झाले. एकदा अपयश आले म्हणून नेहमीच अपयश येईल असे होत नसते. मागच्या वेळी ज्या त्रुटी होत्या, त्या विचारात घेऊन कार्यवाही करावी मंजूर करावे.

श्री.राजेंद्र जंजाळ :यापुर्वी परीवहन मंडळ सोबत चर्चा केली, एवढया बस पुरविणे शक्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बेकायदेशीर वाहतुकीमूळे शहरातील ज्येष्ठ नागीरक, नागरीक व विद्यार्थी यांना मोठा त्रास होतो. खाजगी संस्थेला हे काम देतांना ते कोणत्या व कशा पध्दतीने सुविधा देणार संस्थेची जबाबदारी काय असणार आहे त्यांचा हिस्सा किती महापालिकेचा किती. शहराची गरज लक्षात घेता दळणवळण करणारी संस्था पाहिली

पाहिजे सर्व त्रुट्या पुर्ण करून कोणत्या रस्त्यावर केंव्हा किती बस धावणार आहे? सर्व नियोजन करून कार्यवाही करावी.

मा.उपमहापौर :शहर बससेवा देणे ही मनपाची प्राथमिक सेवा आहे. मागिल वेळेस ज्या त्रुटी बाकी होत्या. त्या आता पुर्ण कराव्या या बस सेवेमूळे राज्य सेवा बसवर लिमिटेशन येईल. जुन्या शहरात रस्ते लहान आहे. अत्याधुनिक पध्दतीने यात चांगल्या पध्दतीने काय नवीन सुधारणा करता येतील ते करावे. प्रशासनाने यात स्वत: लक्ष देऊन सविस्तर नियोजन करावे व सविस्तर सभागृहा समोर आणावे.

मा.महापौर :हा धोरणात्मक निर्णय असेल तर सभागृहाच्या भावना विचारात घेतल्या जाव्यात. शहरातील सर्व नागरीकांसाठीचा हा विषय आहे.या विषयी प्रशासनाने लक्ष देऊन कमेटी करून कमेटीने यामध्ये अभ्यास करून सविस्तर अटी शर्ती नमूद करून तसा प्रस्ताव सभागृहापूढे सविस्तर सादर करावा. यात मनपाचे नुकसान होणार नाही. याचीही दखल घेतली जावी.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हा धाोरणात्मक निर्णय असेल तर सभागृहाच्या भावना विचारात घेतल्या जाव्यात शहरातील सर्व नागरीकांसाठीचा हा विषय आहे. या विषयी प्रशासनाने कमेटी करून कमेटीने यामध्ये अभ्यास करून सविस्तर अटी शर्ती नमूद करून तसा प्रस्ताव सभागृहापूढे सविस्तर सादर करण्यास व प्रस्ताव सादर करतांना महापालिकेचे नुकसान होणार नाही याची देखल घेण्यास मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्रमांक ३०८:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील बहुतांश नाल्यावर नागरीकांनी काही व्यावसायीकांनी तसेच बांधकाम व्यावसायीकांनी अतिक्रमण करुन नाल्याची जागा ताब्यात घेतली आहे. त्यांनी केलेल्या अतिक्रमणामुळे नाल्याची रुंदी कमी झाल्यामुळे बहुतांश ठिकाणी नाला चोकअप होऊन नाल्याचे पाणी नागरीकांच्या घरात जाण्याचे प्रकार घडले आहेत.

शहरातील नाल्याची जागा अबाधीत रहावी व नाल्याचे संरक्षण व्हावे आणि नाल्याच्या पाण्यामुळे कोणत्याही प्रकारची दुर्घटना घडु नये यासाठी शहरातील नाल्याला संरक्षित भिंत बांधण्यात यावी व नाल्याची हद्द निश्चित करुन त्या नाल्याचे पी.आर. कार्डवर महापालिकेच्या नावाची नोंद करण्यात यावी, करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ **अनुमोदक:-**श्री.दिलीप गंगाधर थोरात

श्रीमती अर्चना निळकंठ : नाल्याची सिमा निश्चित करावी. पी आर कार्डवर नाव लावावे.

मा.महापौर : विषय मंजूर. पुर्ण शहरासाठी हा विषय आहे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील नाल्याची जागा अबाधीत रहावी व नाल्याचे संरक्षण व्हावे आणि नाल्याच्या पाण्यामुळे कोणत्याही प्रकारची दुर्घटना घडु नये यासाठी शहरातील नाल्याला संरक्षित भिंत बांधण्यात यावी व नाल्याची हद्द निश्चित करुन त्या नाल्याचे

पी.आर. कार्डवर महापालिकेच्या नावाची नोंद करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३०९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद परिवहन कार्यालयासमोर जलवाहीनीच्या कामाकरीता खड्डा खोदलेला होता व काम पुर्ण झाल्यानंतर सदरील खड्डा व्यवस्थित बुजवलेला नव्हता. या खड्ड्यामुळे एका खाजगी शाळेचा शिक्षक नामे श्री.रिजवान अली अकबर अली, रा.लेबर कॉलनी हा तरूण शिक्षक मृत्युमूखी पडला व त्याच्या मृत्युस महानगरपालिकेचा गलथान कारभार कारणीभूत आहे. करीता महानगरपालिकेतर्फे सदरील तरुणाच्या कुटूंबास र.रु.५ लक्षची आर्थिक मदत करण्यात यावी. जेणे करून सदरील तरुणाच्या कुटूंबांस थोडे फार आर्थिक पाठबळ मिळेल.

करीता, प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**सुचकः-** श्री.अफसर खान यासीन खान **अनुमोदकः-**श्री.जहांगीर खान मुलानी

श्री.रेणुकादास वैद्य : महापालिकचे ड्रेनेज लाईनचे काम चालू असतांना आकाश जाधव यांचा मृत्यू झाला त्याचे कुटूंबीयांनाही मदत करावी.

मा.महापौर : दुरूस्तीसह मंजूर नियमानुसार आर्थीक मदत करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद परिवहन कार्यालयासमोरील जलवाहीनीच्या कामाकरीता खोदलेल्या खड्ड्यामुळे खाजगी शाळेचा शिक्षक श्री.रिजवान अली अकबर अली, रा.लेबर कॉलनी यांचा मृत्यु झाल्याने संबंधीत व्यक्तीच्या कुटूंबास तसेच ड्रेनेज लाईनचे काम चालू असतांना श्री.आकाश जाधव यांचाही मृत्यु झाल्याने त्यांच्या कुटूंबास र.रु.५ लक्षची आर्थिक मदत देण्याकरीता नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३१०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, चालू उन्हाळा हंगाम इ.स.-२०१६ मध्ये औरंगाबाद शहरात महापालिकेच्या जागेवर तसेच खाजगी जागेवर भरपूर रसवंती गृह चालू होतात. महानगरपालिकेतर्फे यापुर्वी इ.स.-२०११ पर्यंत रसवंती चालकांना महापालिकेचे नाहरकत प्रमाणपत्र देण्यात येत होते त्याच्या माध्यमातून महानगरपालिकेला लाखो रुपये उत्पन्न मिळत होते. इ.स.-२०११ सालानंतर महापालिकेने रसवंती गृहाला तात्पुरते नाहरकत प्रमाणपत्र देणे बंद केले परंतु महापालिकेचे नाहरकत प्रमाणपत्र नसतांनाही महानगरपालिकेच्या जागेवर तसेच खाजगी जागेवर शेकडो रसवंती गृह दरसाल चालतात. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान आज पर्यंत झालेले आहे. तरी चालू हंगाम इ.स.-२०१६ मध्ये महापालिकेच्या नियमाचे पालन करून तात्पुरते नाहरकत प्रमाणपत्र देण्यात यावेत जेणे करून महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल तसेच बेरोजगार लोकांना तात्पुरता रोजगार उपलब्ध होईल. करीता, प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**सुचकः-** श्रीमती मोरे ज्योती राजाराम, **अनुमोदकः-** श्रीमती विधाते अंकिता अनिल

श्री.नंदकुमार घोडेले :वर्तमान पत्रात जाहीर प्रगटन देऊन विहित असलेल्या अटी शर्ती शिथील करून देण्यात यावे.

श्री.राजेंद्र जंजाळ :दुकान समोर लावू नये ओपन जागा असेल तेथे देण्यात यावे.

मा.महापौर :यापुर्वी परवानगी देत होतो. जागा असेल तेथे दयावे संबंधीतांकडून आवश्यक ते डिपॉजीट घ्यावे. साफसफाई होईल व मनपाच्या अटी शर्ती नुसार देण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, उन्हाळा हंगाम इ.स.-२०१६ मध्ये शहरात महापालिकेच्या जागेवर तसेच खाजगी जागेवर भरपूर रसवंती गृह चालू होतात. यांना महापालिकेच्या नियमाचे पालन करून तसेच आवश्यक ते डिपॉजीट घेऊन तेथील साफसफाई व मनपाच्या अटी शर्ती नुसार तात्पुरते नाहरकत प्रमाणपत्र देण्यास नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३११:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ९५ बाळकृष्ण नगर मध्ये श्री.बाबुराव जोंधळे ते श्री.ज्ञानेश्वर गायके यांच्या घरापर्यंत डब्बर मध्ये नाल्याचे बांधकाम करून त्यावर सिमेंट कॉंक्रीट स्लॅब चे काम झालेले आहे. त्यावेळेस ते आवश्यक होते. आज त्या ठिकाणी खुप दाट वस्ती झालेली आहे. सध्या त्या नाल्या मध्ये ड्रेनेज लाईन फुटून खुप विष्ठा व घाणपाणी जमा झाले आहे. त्यामुळे नागरीकाच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. तसेच ड्रेनेज लाईनचे चेंबरला कमकुवत जागा असल्यामुळे पुर्ण गाळाने भरलेली असून लाईन पुर्ण निकामी झाली आहे. वस्ती दाट झाल्यामुळे नाल्याला पावसाचे पाणी येणे आत बंद झालेले आहे. तरी नाल्यावरील स्लॅब तोडुन भरती टाकणे व निकामी झालेली ड्रेनेज लाईनची देखभाल दुरूस्ती करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचकः-** श्रीमती मोरे ज्योती राजाराम **अनुमोदकः-**श्रीमती विधाते अंकिता अनिल

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र. ९५ बाळकृष्ण नगर मध्ये श्री.बाबुराव जोंधळे ते श्री.ज्ञानेश्वर गायके यांच्या घरापर्यंत डब्बर मध्ये नाल्याचे बांधकाम करून त्यावर सिमेंट कॉंक्रीट स्लॅबचे काम झालेले असून त्यावेळेस ते आवश्यक होते सदर नाल्यावरील स्लॅब तोडुन भरती टाकणे व निकामी झालेली ड्रेनेज लाईनची देखभाल दुरूस्ती करण्यासाठी नियमाने कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक व्हावी.

**विषय क्रमांक ३१२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९५ मध्ये पुर्वी खंब्यासह पथदिवे लावलेले आहेत. त्या वेळेस वस्ती विरळ होती. आज दाटवस्ती झाल्याने काही खंबे खाजगी प्लॉटवर गेलेले आहेत, काहींचा वाहतूकीला अडथळा निर्माण झालेला आहे. काही ठिकाणी महावितरणाचा पोल आणि पथदिव्यांचे खंबे एकत्र आलेले आहेत. काहींचा राहत्या घराला धोका झालेला आहे. असे सर्व पोल काढून त्याच भागामध्ये आवश्यक त्या ठिकाणी लावण्यासाठी व त्याची देखभाल दुरूस्तीसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**सुचकः-** श्रीमती मोरे ज्योती राजाराम **अनुमोदकः-**श्रीमती विधाते अंकिता अनिल

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९५ मधील पथदिव्यांची खांबे खाजगी प्लॉटवर, काहींचा वाहतूकीला अडथळा, काही ठिकाणी महावितरणाचा पोल आणि पथदिव्यांचे खंबे एकत्र आलेले तर काहींचा राहत्या घराला धोका असल्याने असे सर्व पोल काढून त्याच भागामध्ये आवश्यक त्या ठिकाणी लावणे व देखभाल दुरूस्ती करणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३१३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, बीड बायपास रोडवरील समृध्दी पार्क सेल्फ डेव्हलपमेंट मध्ये करण्यात आलेले आहे. तरी सदरील समृध्दी पार्क सोसायटी मधील नागरीकांना नागरी सुविधा वेळेवर उपलब्ध व्हाव्यात यासाठी या सोसायटींचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण करणे जरुरी आहे. या परिसरातील रहिवाशी नागरीकांनी या सोसायटीचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण करून घेणे बाबत विनंती केलेली आहे.

सेल्फ डेव्हलपमेंट मधील सोसायटींना यापुर्वी महानगरपालिकेतर्फे सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे समृध्दी पार्क या सोसायटीचे योग्य ती कार्यालयीन कार्यवाही करून महानगरपालिकेकडे तात्काळ हस्तांतरीत करून घेण्यात यावे. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे **अनुमोदक:-**श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले

सहा.संचालक न.र :हा भाग सेल्फ डेव्हलपमेंन्ट मध्ये आहे. हॅण्डवर्क करून घेणे बाबतचा विषय आहे. संबंधीतांनी तेथे विकास करावा. पॉलीसी डिसीजन घ्यावे लागेल.

श्री.नंदकुमार घोडेले :तेथील नागरीक मेन्टेनन्स् करीत असेल तर मालमत्ता करात सुट देण्याचे धोरण होते.

श्री.रेणुकादास वैद्य :बिल्डर बांधकाम करून घरे विक्री करतात. सुविधा देत नाही असे विषय वारवांर समोर येतात. तेथील नागरीकांना सुविधा मिळायला पाहिजे. बिल्डर सुविधा देणार नसेल तर तसे त्यांचेकडून लिहून घ्यावे कार्यवाही करावी.

श्री.अफसर खान :परवानगी देतांना सर्व सुविधा देऊ. या अटीवर परवानगी देत असतो. तेथे सुविधा बिल्डर देत नसतील, तर त्यांचेकडून तेथील खर्च वसुल करावा. सेल्फ डेव्हलपमेन्टचा भाग समाविष्ट करून घेता येतो का?

श्री.रेणुकादास वैद्य :संबधीत बिल्डरांवर कार्यवाही केली पाहिजे.

मा.महापौर :नागरीकांना सुविधा मिळाल्या पाहिजे. संबंधीत बिल्डरला नोटीस देऊन काम करून घ्यावे. परवानगी किती दिली होती? काय अटी शर्ती होत्या. सविस्तर माहितीसह प्रस्ताव पुढील सभेत ठेवावा. प्रस्तावानुसार हे पॉलीसी डिसीजन आहे.

**ठराव :**

या प्रस्तावाच्या संदर्भाने नागरीकांना सुविधा मिळाल्या पाहिजे संबंधीत बिल्डरला नोटीस देऊन काम करून घ्यावे परवानगी कशा प्रकारे दिली होती? अटी/शर्ती काय होत्या? या सविस्तर माहिती सह प्रस्ताव पुढील सभेत ठेवण्यास मंजुरी देण्यात आली.

**विषय क्रमांक ३१४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.११० मयुरबन कॉलनी परिसरातील शंभूनगर व शिवनगर या दलित वसाहतींमध्ये दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीट रस्ते तयार करण्यासाठी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत रक्कम रुपये ५०.०० लक्ष उपलब्ध करून देण्यात यावे. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे **अनुमोदक:-**श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले

मा.महापौर :विषय मंजुर. नियमाने कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.११० मयुरबन कॉलनी परिसरातील शंभूनगर व शिवनगर या दलित वसाहतींमध्ये विविध ठिकाणी कॉंक्रीट रस्ते तयार करण्यासाठी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत रक्कम रुपये ५०.०० लक्षचा निधी उपलब्ध करून देणेसाठी नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३१५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१४ अंतर्गत गरीब व हातावर काम करणारे नागरीक राहतात. या भागात बऱ्याच वर्षापासून ड्रेनेज लाईन टाकणे, दुरूस्ती करणे,जलवाहीनी टाकणेचे काम, विद्युत व्यवस्था,रस्त्याचे काम बऱ्याच भागात झालेले नाही. या भागात वरील सुविधा नसल्याने परिसरातील नागरीकांची अत्यंत गैरसोय होत आहे.

करीता या वार्डांतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे, जलवाहीनी टाकणे, विद्युत व्यवस्था पोलसह करणे, रस्ते कॉंक्रीटीकरण करणे यासाठी रक्कम रुपये ०४.०० कोटी निधी आवश्यक आहे. करीता सदरील कामे करण्यासाठीचा दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत निधी प्राप्त होणे करीता प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे पाठविणे प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.सुभाष सयाजीराव शेजवळ **अनुमोदक:-**श्रीमती आशाताई विजय निकाळजे

मा.महापौर :विषय मंजुर. नियमाने कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१४ मध्ये दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे, जलवाहीनी टाकणे, विद्युत व्यवस्था पोलसह करणे, रस्ते कॉंक्रीटीकरण करणेसाठी रक्कम रुपये ०४.०० कोटीचा निधी उपलब्ध होणे करीता प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे पाठविण्याकरीता नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३१६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०२ मिलिंद नगर येथील सामाजिक सभागृह खुप जुने झाले असुन मोडकळीस आले आहे. तसेच येथे असलेल्या उद्यानाचे सुशोभीकरण करण्यात यावे.

करीता सदरील सभागृह नव्याने बांधण्यात यावे तसेच या ठिकाणी असलेल्या उद्यानाचे सुशोभी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत करण्यास व या दोन्ही कामासाठी येणाऱ्या अंदाजीत खर्च रु.३५ लक्ष निधी उपलब्धतेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे,
**अनुमोदक:-**श्रीमती सुनिता रामराव चव्हाण,श्रीमती ज्योती जयेश अभंग,
श्रीमती लताबाई मगन निकाळजे
मा.महापौर :विषय मंजुर. नियमाने कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०२ मिलिंद नगर येथे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत तेथे मोडकळीस आलेले सामाजीक सभागृह नव्याने बांधणे व याच ठिकाणी असलेल्या उद्यानाचे सुशोभीकरण करण्यासाठी र.रु.३५ लक्षचा निधी उपलब्धत होणेसाठी नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्रमांक ३१७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगपुरा या भागात महानगरपालिकेची खुली जागा आहे. या मोकळ्या खुल्या जागेवर औरंगाबाद शहराच्या ठोक फुले विक्रेतेसाठी दुकानास्वरुप भाडेतत्वावर दुकाने उपलब्ध करून देणे करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.नासेर सिद्दीकी तकीउद्दीन **अनुमोदक:-**श्री.सय्यद मतीन रशिद
श्री.नंदकुमार घोडेले :कायदेशीर सल्ला घेऊन कार्यवाही करावी.
मा.महापौर :या विषया संदर्भात नियमानुसार व कायदेशीर बाबी तपासून माहिती सादर करावी. हा विषय पुढील सभेत घेण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत संबंधीत अधिकारी यांनी नियमानुसार व कायदेशीर माहिती सादर करावी. हा विषय पुढील सभेत घेण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्रमांक ३१८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक-५० मधील येणाऱ्या दलित वसाहतीमध्ये शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत (१) लक्ष्मी कॉलनी येथे सिमेंट कॉंक्रेट करणे - २० लक्ष रुपये, (२) प्रबुध्दनगर येथे विविध गल्लीत सिमेंट कॉंक्रेट रस्ता तयार करणे - १५ लक्ष रुपये, (३) कोतवालपुरा येथे गल्ल्यांमध्ये सिमेंट कॉंक्रेट रस्ता तयार करणे-१५ लक्ष रुपये उपरोक्त ठिकाणी सदरील कामे करण्यासाठी रुपये ५० लक्षाचे निधी प्राप्त होणेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती नसरीन बेगम समद यारखान
**अनुमोदक:-** श्री.सय्यद मतीन रशीद, श्री.नासेर सिद्दीकी तकीउद्दीन
मा.महापौर :विषय मंजुर. नियमाने कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक-५० येथे शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत लक्ष्मी कॉलनी येथे सिमेंट कॉंक्रेट करणे, प्रबुध्दनगर येथे विविध गल्लीत सिमेंट कॉंक्रेट रस्ता तयार करणे, कोतवालपुरा येथे गल्ल्यांमध्ये सिमेंट कॉंक्रेट रस्ता तयार करणे एकुण रक्कम रुपये ५० लक्षचा निधी उपलब्ध होणेसाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविणेकरीता नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

इति.स.सा.सभा दिनांक १५-०३-२०१६
(कार्यक्रम पत्रिका क्रमांक-१४)

**विषय क्रमांक ३१९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नगर रचना विभागामध्ये १५ ते २० वर्षापासुन तळ ठोकून बसलले नगर रचना विभागातील कर्मचारी व अधिकारी यांच्या बदल्या करण्यात यावेत व या विभागातुन १० वर्षानंतर ज्या उप-अभियंत्याच्या बदल्या झालेल्या आहेत ते उप-अभियंता ३ ते ४ महिन्यात परत नगर रचना विभागामध्येच बदल्या करुन घेतात अशा कर्मचारी व अधिकारी यांच्या बदल्या रद्द करुन त्यांची चौकशी करण्यात यावी.

**सुचक:-** श्रीमती सुनिता रामराव चव्हाण

**अनुमोदक:-** श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे, श्रीमती ज्योती जयेश अभंग

मा.महापौर :अधिकारी/कर्मचारी यांच्या बदल्या करणे ही प्रशासकीय बाब आहे. या बाबत प्रशासनाने योग्य तो निर्णय घ्यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नगर रचना विभागातील अधिकारी/कर्मचारी यांच्या बदल्या करणे बाबत प्रशासनाने योग्य तो निर्णय घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३२०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जुना वॉर्ड क्र.४४ (जुना) किराडपुरा येथील युनुस भाई यांच्या गल्लीत व विविध ठिकाणी कॉंक्रेटींग रस्त्याचे काम करणेसाठी सन २०१४-१५ या वर्षात रुपये ०५.०० लक्षाची निविदा मंजुर आहे व संबंधीत ठेकेदारास कार्यादेश सुध्दा देण्यात आलेला आहे. ज्या भागात हे काम प्रस्तावित आहे त्या ठिकाणी सदरचे काम न करता हयाच वॉर्डात अख्तर भाई यांच्या समोरील गल्लीत, मियाभाई यांच्या लगतच्या गल्लीत व बोमीलवाली गल्ली, या भागात अस्तित्वातील अत्यंत खराब झालेला रस्ता कॉंक्रेटींग करणेसाठी कामाचे स्थळ बदल करण्यास प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती नसीम बी सांडु खॉ **अनुमोदक:-**श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख

श्री.रेणुकादास वैद्य :स्थळ बदलाचे वार्डातील प्रस्तावा बाबत प्रशासनाने त्यांचे स्तरावर निर्णय घ्यावे.

मा.महापौर :त्याच वार्डातील विकास काम असेल तर असे स्थळ बदलाचे प्रस्तावावर प्रशासनाने त्या-त्या वार्डाचे स.सदस्य यांचे पत्र वगैरे घेऊन कार्यवाही करणे योग्य होत असेल तर तशी कार्यवाही नियमाने करावी. हा विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जुना वॉर्ड क्र.४४ (जुना) किराडपुरा येथील युनुस भाई यांच्या गल्लीत व विविध ठिकाणी रस्त्याचे कॉंक्रेटींग करणेसाठी सन २०१४-१५ मधील रक्कम रुपये ०५.०० लक्षची मंजुर निविदा व संबंधीत ठेकेदारास दिलेले कार्यादेशानुसार ज्या भागात हे काम प्रस्तावित आहे त्या ठिकाणी सदरचे काम न करता हयाच वॉर्डात अख्तर भाई यांच्या समोरील गल्लीत, मियाभाई यांच्या लगतच्या गल्लीत व बोमीलवाली गल्ली या भागात अस्तित्वातील खराब रस्त्याचे कॉंक्रेटींग करणेसाठी कामाचे स्थळ बदल करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३२१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जुना वॉर्ड क्र.४४ (जुना) किराडपुरा येथील कॉंक्रेटींग करणे व पेव्हर ब्लॉक बसविणेसाठी सन २०१४-१५ या वर्षात रुपये १०.०० लक्षाची निविदा मंजुर आहे व संबंधीत ठेकेदारास कार्यादेश सुध्दा देण्यात आलेला आहे. ज्या भागात हे काम प्रस्तावित आहे त्या ठिकाणी सदरचे काम न करता अरफात मस्जीद समोरील अस्तित्वातील अत्यंत खराब झालेला रस्ता कॉंक्रेटींग करणेसाठी कामाचे स्थळ बदल करण्यास प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती नसीम बी सांडु खॉ **अनुमोदक:-**श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख

मा.महापौर :-विषय मंजूर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जुना वॉर्ड क्र.४४ (जुना) किराडपुरा येथील कॉंक्रेटींग करणे व पेव्हर ब्लॉक बसविणेसाठी सन २०१४-१५ मधील रक्कम रुपये १०.०० लक्षची मंजुर निविदा व संबंधीत ठेकेदारास दिलेले कार्यादेशानुसार ज्या भागात हे काम प्रस्तावित आहे त्या ठिकाणी सदरचे काम न करता अरफात मस्जीद समोरील अस्तित्वातील खराब रस्त्याचे कॉंक्रेटींग करणेसाठी कामाचे स्थळ बदल करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३२२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक-११, हर्षनगर-विश्वासनगर या वॉर्डांतर्गत येणाऱ्या दलित वसाहती मध्ये शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते तयार करणेसाठी रुपये १५.०० लक्ष निधी प्राप्त होणेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविणेसाठी मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.मोहम्मद अय्युब खान हुसैन खान (मोमीन),

**अनुमोदक:-**श्री.अब्दुल मं.नावीद अब्दुल रशीद.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक-११,हर्षनगर-विश्वासनगर येथे शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते तयार करणेसाठी रुपये १५.०० लक्ष निधी प्राप्त होणेसाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्याकरीता नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३२३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक-११, हर्षनगर-विश्वासनगर या वॉर्डांतर्गत येणाऱ्या अल्पसंख्याक वसाहती मध्ये शासनाच्या अल्पसंख्याक योजने अंतर्गत सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते तयार करणेसाठी रुपये १५.०० लक्ष निधी प्राप्त होणेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविणेसाठी मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.मोहम्मद अय्युब खान हुसैन खान (मोमीन),

**अनुमोदक:-**श्री.अब्दुल मं.नावीद अब्दुल रशीद.

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक-११, हर्षनगर-विश्वासनगर येथे शासनाच्या अल्पसंख्याक योजने अंतर्गत सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते तयार करणेसाठी रुपये १५.०० लक्ष निधी प्राप्त होणेसाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्याकरीता नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## <u>पुरवणी विषय</u>

**<u>विषय क्रमांक ३२५:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माझ्या वॉर्डातील मंजुर काम वॉर्ड क्र.४५ रहेमानिया कॉलनी येथील पेव्हर ब्लॉक बसविणे स्पील रक्कम रुपये १० लक्ष हे लेखाशिर्ष बदलुन रहेमानिया कॉलनी येथे ट्रिमिक्स कॉंक्रीट रस्ता करणे असे लेखाशिर्ष बदलायचे आहे.

करीता लेखाशिर्ष बदलण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.खान इरशाद इब्राहीम **अनुमोदक:-** श्री.गंगाधर नामदेव ढगे

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४५ रहेमानिया कॉलनी येथील पेव्हर ब्लॉक बसविणे स्पील रक्कम रुपये १० लक्ष हे लेखाशिर्ष बदलुन रहेमानिया कॉलनी येथे ट्रिमिक्स कॉंक्रीट रस्ता करणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ३२६ :-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.४५ रहेमानिया कॉलनी गल्ली नं.११ मध्ये ट्रिमीक्स कॉंक्रीट रस्ता तयार करणे या कामाऐवजी वॉर्ड क्र.४५ रहेमानिया कॉलनी गल्ली नं.१२ मध्ये ट्रिमीक्स कॉंक्रीट रस्ता तयार करणे. करीता लेखाशिर्ष बदलण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.खान इरशाद इब्राहीम **अनुमोदक:-** श्री.गंगाधर नामदेव ढगे

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४५ रहेमानिया कॉलनी गल्ली नं.११ मध्ये ट्रिमीक्स कॉंक्रीट रस्ता तयार करणे हे लेखाशिर्ष बदलुन वॉर्ड क्र.४५ रहेमानिया कॉलनी गल्ली नं.१२ मध्ये ट्रिमीक्स कॉंक्रीट रस्ता तयार करणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ३२७:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१३,भिमनगर (उत्तर), भावसिंगपुरा येथील गट क्र.२६, पेठेनगर या ठिकाणी मातंग समाजासाठी व ख्रिस्ती समाजगृहाची उभारणी करण्यात यावी. जेणे करून या समाजाला याचा लाभ होईल.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती आशाताई विजय निकाळजे **अनुमोदक:-** श्री.राजगौरव हरीदास वानखेडे

मा.महापौर :-विषय मंजूर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.१३,भिमनगर (उत्तर), भावसिंगपुरा येथील गट क्र.२६, पेठेनगर या ठिकाणी मातंग व ख्रिस्ती समाजासाठी नियमाप्रमाणे समाजगृहाची उभारणी करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३२८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१३ भिमनगर (उत्तर), भावसिंगपूरा येथील मनपा उद्यानामध्ये पोलिस चौकीची उभारणी मनपातर्फे करण्यात यावी. जेणेकरून मनपा उद्यान,मनपा आरोग्य केंद्र, मनपा प्राथमिक शाळा व वॉर्डातील नागरीकांना आणि शेजारील वॉर्ड क्र.१६ मधील नागरीकांना सुरक्षितता वाटेल. आणि पोलिस चौकीमुळे होणाऱ्या गैरप्रकारांना व गुंडागर्दीला आळा बसेल.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती आशाताई विजय निकाळजे **अनुमोदक:-** श्री.राजगौरव हरिदास वानखेडे

मा.महापौर :-विषय मंजूर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१३ भिमनगर (उत्तर), भावसिंगपूरा येथील महानगरपालिकेच्या उद्यानामध्ये महानगरपालिकेतर्फे नियमाप्रमाणे नविन पोलिस चौकीची उभारणी करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३२९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.१०० ज्योतिनगर अंतर्गत चौसरनगर हा भागझोपडपट्टी घोषित असून या ठिकाणी ७०% पेक्षा जास्त दलित समाजाची वसाहत आहे. मनपास दलित वसाहतींसाठी प्राप्त होणारा निधी या वसाहतीकरीता मिळावा करीता मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दलित वसाहतीसाठी मिळणाऱ्या निधीतून र.रु.५० लक्षचा निधी या वसाहतीतील अंतर्गत रस्ते कॉँक्रीटचे बनवण्याकरीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती सुमित्रा गिरजाराम हाळनोर **अनुमोदक:-**श्री.बन्सी ग्यानु जाधव

मा.महापौर :-विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.१०० ज्योतिनगर येथे शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत चौसरनगर अंतर्गत रस्ते कॉँक्रीटीकरण करण्यासाठी र.रु.५० लक्षचा निधी उपलब्ध करण्याकरीता प्रस्ताव जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्याकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३३०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, उत्तरानगरी, वॉर्ड क्र.३६, येथील अंतर्गत रस्त्यांची खुप दुरावस्था झालेली असुन त्यामुळे गोरगरीब जनतेला त्याचा त्रास सहन करावा लागत आहे.

तरी सदरील रस्त्याच्या मजबुतीकरणासाठी रक्कम रुपये २५,००,०००/- लक्ष निधी आपणाकडुन मिळुन सदरील रस्ते दुरुस्त करण्यात यावे. तरी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप **अनुमोदक:-**श्री.रुपचंद लक्ष्मण वाघमारे

मा.महापौर :-विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३६, उत्तरानगरी, येथील अंतर्गत रस्त्याच्या मजबुतीकरणासाठी रक्कम रुपये २५,००,०००/- लक्ष निधी उपलब्ध होणेकरीता नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३३१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक-११० मयुरबन कॉलनी या प्रभागातील पोद्दार हायस्कुल ते गादिया विहार हा रस्ता अत्यंत खराब झालेला असून या रस्त्यावर खड्ड्यांमुळे या ठिकाणी वाहन धारकांना वाहन चालविणे कठीण झालेले आहे. त्यामुळे हा रस्ता लवकरात लवकर व्हाईट टॉपींगचा करणे अत्यावश्यक असल्याने या रस्त्यासाठी औरंगाबाद शहराचे पालकमंत्री मा.श्री.रामदासजी कदम साहेब यांनी रक्कम रुपये २५.०० लक्षचा निधी उपलब्ध करून दिलेला आहे. सदरील निधीमधून पोद्दार हायस्कुल ते गादिया विहार हा रस्ता व्हाईट टॉपींगचा करण्यात यावा करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे **अनुमोदक:-**श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ

मा.महापौर :-विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्रमांक-११० मयुरबन कॉलनी या प्रभागातील पोद्दार हायस्कुल ते गादिया विहार या रस्त्यासाठी औरंगाबाद शहराचे पालकमंत्री मा.श्री.रामदासजी कदम साहेब यांनी उपलब्ध करून दिलेल्या रक्कम रुपये २५.०० लक्षच्या निधीमधून हा रस्ता व्हाईट टॉपींगचा करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३३२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, आंबेडकर नगर जाधववाडी वॉर्ड क्र.३२ या ठिकाणी आंबेडकर चौकामध्ये आरोग्य केंद्रासाठी एम.आय.डी.सी.ची रिकामी जागा असुन ती जागा आरोग्य केंद्रासाठी देण्यात यावी. अशी शिफारस मा.पालकमंत्री रामदासभाई कदम यांनी त्यांच्या पत्राद्वारे केली आहे. त्या परिसरामध्ये आजुबाजुला स्लम झोपडपट्टया असुन त्या ठिकाणी मनपाचे जवळपास आरोग्य केंद्र नसुन त्या नागरीकांना आरोग्याचा काही त्रास झाल्यास त्यांना मिलकॉर्नर औरंगाबाद घाटीमध्ये जावे लागते त्यामुळे काही लोकांना स्वत:चे प्राणही गमवावे लागतात म्हणून महापौर साहेबांना विनंती करण्यात येते की, आंबेडकर चौकात नविन आरोग्य केंद्राचे बांधकाम करुन ५० खाटाचे आरोग्य केंद्र उभारणी करावी. जेणे करुन आजुबाजुच्या ५ ते ६ वॉर्डाच्या नागरीकांना त्याचा लाभ होईल. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती भारती महेंद्र सोनवणे **अनुमोदक:-** श्री.गंगाधर नामदेव ढगे

मा.महापौर :-विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, आंबेडकर नगर जाधववाडी वॉर्ड क्र.३२, आंबेडकर चौकामध्ये एम.आय.डी.सी.ची रिकाम्या जागेवर नविन आरोग्य केंद्राचे बांधकाम करुन ५० खाटाचे आरोग्य केंद्र उभारणेकरीता नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाी व्हावी.

**<u>विषय क्रमांक ३३३:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३८, एम.आय.डी.सी. चिकलठाणा, या प्रभागामध्ये मोठ्या प्रमाणात एम.आय.डी.सी. आहे, येथील एम.आय.डी.सी. च्या रस्त्यांची दयनिय अवस्था झाली असुन भरपुर प्रमाणात पथदिवे बंद पडलेले आहेत. त्या भागात आजुबाजुच्या वॉर्डातील किंवा वसाहतीतील नागरीक कंपनीमध्ये काम करण्यासाठी येतात तसेच या नागरीकांना रात्रीच्या वेळी येण्या-जाण्यास पथदिवे बंद असल्यामुळे व रस्ते व्यवस्थित नसल्याकारणाने त्यांना त्याच कंपनीत मुक्काम करावा लागतो, तसेच बाहेरुन उद्योजक पाहणी करण्यासाठी किंवा काही ऑर्डर देण्यासाठी येतात, तेथील रस्त्याची व पथदिव्यांची अवस्था बघुन कामाच्या ऑर्डरला नकार दिल्या जातो, त्यामुळे नकळत शहराच्या विकासावरती आणि महानगरपालिकेच्या उत्पन्नावरतीही त्याचा परिणाम होतो. त्यामुळे मनपाचे व कंपनीचे सुध्दा उत्पन्न कमी होत आहे. करीता माझ्या वॉर्ड क्र.३८ एम.आय.डी.सी.चिकलठाणा या वॉर्डातील मिळणाऱ्या उत्पन्नातुन फक्त १० टक्केचे प्रत्येक वर्षी बजेट मध्ये तरतुद करण्यात यावे. तसेच एम.आय.डी.सी. चिकलठाणा येथील काही उद्योजक रस्ते तयार करण्याकरीता मा.न्यायालयाकडे गेले असता मनपाच्या वतीने मा.न्यायालयात लेखी स्वरुपात रस्ते तयार करण्यात येतील असे नमुद केले आहे.

करीता एम.आय.डी.सी.चिकलठाणा येथुन मिळणाऱ्या उत्पन्नातुन वॉर्ड क्र.३८ एम.आय.डी.सी. चिकलठाणा येथे प्रत्येक वर्षी १० टक्के बजेट मध्ये तरतुद करण्यात यावी. करीता सदर प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.राजु रामराव शिंदे **अनुमोदक:-** श्री.गोकुळसिंग संपतसिंग मलके

मा.महापौर :-विषय मंजूर.प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३८ एम.आय.डी.सी.चिकलठाणा या वॉर्डातून मिळणाऱ्या उत्पन्नातुन फक्त १० टक्केच प्रत्येक वर्षी बजेट मध्ये तरतुद करण्यास मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ३३४:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३५ नारेगाव या वॉर्डाला विशेष वॉर्डाचा दर्जा देण्यात यावा, गेल्या ३० ते ३५ वर्षापासुन ११३ वॉर्डाचा कचरा नारेगाव येथे येतो, तेथील नागरीकांच्या आरोग्यावर त्याचा दुष्परिणाम होत असुन हा भाग शहरामध्ये असुन सुध्दा हा भाग विकास कामातुन वंचित आहे. त्या भागातील समस्या शहरापेक्षा वेगळ्या आहेत. त्या नारेगाव भागात कचरा डेपोमुळे मुला-मुलींचे लग्न जमत नाही. किंवा त्या ठिकाणी मुली दिल्या जात नाही. या वसाहतीत माशांचे साम्राज्य असते. जेवतांना एका माणसाला माशा हाकलण्यासाठी बसावे लागते. मा.आयुक्तांनी विशेष लक्ष दिलेले असुन प्रत्येक वॉर्डाचा कचरा नारेगाव येथे जात असून तेथील नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातुन व विकास करण्या करीता नागरीक सुविधा देण्याकरीता, विशेष निधीची तरतुद प्रत्येक वर्षी बजेटमध्ये १ कोटीची तरतुद करण्यात यावी. करीता सदर प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री. गोकुळसिंग संपतसिंग मलके **अनुमोदक:-** श्री.राजु रामराव शिंदे

मा.महापौर :-विषय मंजूर.प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३५ नारेगाव या वॉर्डाला विशेष वॉर्डाचा दर्जा देण्यास तसेच तेथील नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातुन व विकास करण्या करीता नागरीक सुविधा देण्याकरीता, प्रत्येक वर्षी बजेटमध्ये रक्कम रुपये १ कोटीची तरतुद करण्यास मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३३५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.विनायक राठोड यांचा मुलगा श्री.नकुल विनायक राठोड याची महाराष्ट्र संघाकडून पॉवर लिफ्टींग स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. सदरील स्पर्धा हिमाचल प्रदेश येथे होणार आहे. सदरील स्पर्धेच्या तयारी साठी त्यास शिक्षण, जीम इ.साठी रक्कम रुपये ९०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये नव्वद हजार फक्त) ची आवश्यकता आहे.

करीता श्री.विनायक राठोड यांची आर्थिक परिस्थिती बेताचीच असल्यामुळे तसेच शहरातील खेळाडुंना मदत व्हावी या हेतूने श्री.नकुल विनायक राठोड या खेळाडूस महानगरपालिकेमार्फत रक्कम रुपये ९०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये नव्वद हजार फक्त) ची आर्थिक मदत करण्यात यावी. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती सुनिता रामराव चव्हाण **अनुमोदक:-** श्री.रुपचंद लक्ष्मण वाघमारे

मा.महापौर :विषय मंजुर.प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हिमाचल प्रदेश येथे होणाऱ्या पॉवर लिफ्टींग स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघाकडून खेळणारा श्री.नकुल विनायक राठोड या खेळाडूस औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत रक्कम रुपये ५०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पन्नास हजार फक्त) ची आर्थीक मदत करण्यास मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**टिप:-विषय क्रमांक ३००,३०३,३०७,३२४,३३६ ते ३४३ हे विषय दिनांक २०.०२.२०१६ रोजीच्या सर्वसाधारण सभेत घेण्यात आलेले आहेत.**

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबा

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-१४)

**मंगळवार दिनांक १५.०३.२०१६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील प्रश्नोत्तरे.**

**स.पालिका सदस्या श्रीमती खान सायरा बानो अजमल (प्रभाग क्रमांक-२३)**

**प्रश्न क्रमांक ३७१:-**

वॉर्ड क्र.२३ चेलीपुरा अंतर्गत हर्षनगर-मुर्गीनाला परिसरातील सभागृहाच्या बांधकामापासून सद्यस्थिती पर्यंतचा सविस्तर तपशील मिळणे बाबत माझे दिनांक २ जानेवारी-२०१६ व दिनांक २० जानेवारी-२०१६ मालमत्ता अधिकारी महानगरपालिका औरंगाबाद यांना उद्देशुन लिहीलेले पत्र.

वरील पत्राच्या अनुषंगाने वरील विषयी माहिती का देण्यात आलेली नाही? व माहिती देण्यास होणाऱ्या विलंबाचे कारण काय? तरी संबंधीत अधिकाऱ्याने वरील पत्र पहावे व वरील विषयीची सविस्तर माहिती येणाऱ्या सर्वसाधारण सभेत देण्यात यावी.

**उत्तर:- उपआयुक्त (मालमत्ता), महानगरपालिका औरंगाबाद.**

जा.क्र./मनपा/मामअ/१२७७/२०१६ दिनांक १८.०२.२०१६ रोजी पत्रान्वये कळविले आहे. सदर पत्राची छायांकित प्रत खुलासा पत्रासोबत देण्यात येत आहे.

**स.पालिका सदस्य श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख (प्रभाग क्रमांक-६३)**

**प्रश्न क्रमांक ३७२:-**

महानगरपालिका कडुन स्मशान भुमित मसन जोगी यांची माहिती संबंधी आपल्याला पत्र ०९.१२.२०१५ रोजी दिले असता त्याची माहिती दिले नाही ते पत्र सोबत जोडले आहे. त्याची संपूर्ण माहिती देण्यात यावी.

**उत्तर:- उपआयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद.**

एकुण १५ स्मशान जोगी कार्यरत आहे. स्मशान जोगी मनपाचा आस्थापनेवरील कार्यरत आहे. स्मशान जोगी यांचे वेतन मनपा मार्फत अदा करण्यात येते. यादी खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | स्मशान भुमीचे नांव | शेरा |
|---|---|---|---|
| १) | शिवाजी लक्ष्मण पवार | | से.नि. |
| २) | गंगाराम शंकर गायकवाड | | मृत्य |
| ३) | राम गंगाराम गायकवाड | बनेवाडी | |
| ४) | लक्ष्मण गंगाराम शेळके | | से.नि. |
| ५) | गोविंद राजाराम गायकवाड | पुष्पानगरी | |
| ६) | लक्ष्मण हनुमंत शेळके | | से.नि. |
| ७) | राजाराम गोविंद गायकवाड | बेगमपुरा | |
| ८) | यलप्पा गोविंद शेळके | हर्सुल | |
| ९) | गंगाराम लक्ष्मण पवार | सिंदीबन | से.नि. |
| १०) | साहेबराव कोष्टी पवार | मुकूंदवाडी | |
| ११) | गंगाराम गणपत पवार | रमानगर | |
| १२) | किसन गंगाराम पवार | गारखेडा | |
| १३) | साहेबराव बाबुराव पवार | प्रतापनगर उस्मानपुरा | |
| १४) | साहेबराव गंगाराम शेळके | विटखेडा | |

| | | | |
|---|---|---|---|
| १५) | साहेबराव गंगाराम गायकवाड | कांचनवाडी | |
| १६) | गंगाराम हनुंमत गायकवाड | भावसिंगपुरा | |
| १७) | गंगाराम कोष्टी पवार | आंबेडकरनगर | |
| १८) | सय्यद अलीम स.कादर | एन-६, सिडको | |
| १९) | रामचंद्र लक्ष्मण पवार | ब्रिजवाडी | |
| २०) | लक्ष्मण शंकर गायकवाड | हडको | |

**प्रश्न क्रमांक ३७३:-**

सिडको साफ सफाई संबंधी आपल्याला दिनांक ०४.११.२०१५ रोजी पत्र दिले असता त्याची माहिती आजपर्यंत दिली नाही त्या पत्राची झेरॉक्स कॉपी सोबत जोडली आहे. त्याची संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

**उत्तर:- घनकचरा व्यवस्थापन कक्ष प्रमुख, महानगरपालिका औरंगाबाद.**

नगर सचिव विभागास माहिती अप्राप्त.

**प्रश्न क्रमांक ३७४:-**

**उत्तर:- उपआयुक्त (अतिक्रमण), महानगरपालिका औरंगाबाद.**

| प्र.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ३७४ | पाण्याची टाकी शेजारील अतिक्रमण बाबत आपण दुकानदाराला माझ्या नावाने नोटीस बजावली होती त्या नोटीसांची एक एक प्रत देण्यात यावी. | सोबत सलग्न |
| | तसेच त्यांनी नोटीशीचे जवाब दिले असेल तर त्याची एक एक प्रत दयावी | उत्तर प्राप्त नाही. |
| | जवाब दिला नसेल तर त्यांच्यावर कोणती कार्यवाही केली आहे का? त्याची संपूर्ण माहिती देण्यात यावी. | कार्यवाही केलेली नाही. तथापि, सदर रस्त्याची नगररचना विभागाने मार्किंग करुन दिल्यास रस्त्यावरील पुर्णच अतिक्रमणे काढण्यात येईल. |

**प्रश्न क्रमांक ३७५:-**

गुंठेवारी करतांना आपण जागेच्या मालकाची अभिप्राय मागवितात का व गुंठेवारी कोणत्या नियमानुसार करता?

**उत्तर:- सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद.**

महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम २००१ मधील कलम २ नुसार गुंठेवारी विकास अतिक्रमणाखालील जमीन वगळुन खाजगी मालकीच्या जमिनीची तसेच नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन)अधिनियम १९७६ या खालील राज्य शासनाकडे निहित नसलेल्या अतिरिक्त विकासाचा जमीनीसह अशा भुखंडवरील इमारतीसह कोणतीही असल्यास, अनधिकृतपणे पोट विभागणी करुन तयार केलेले भुखंड कलम ४ मधील २ (क) नुसार भुखंडाच्या मालकीचा किंवा कायदेशीर कब्जाबाबतचा कागदोपत्री पुरावा सादर केल्यानंतर,मंजुर विकास आराखडयांमधील वसाहतीची स्थिती जसे की,आरक्षण रस्ते इत्यादी पाहुन तांत्रिक छाणणीनंतर नियमितीकरण केले जाते. अर्जदाराने सादर केलेल्या मालकी हक्काच्या कागदपत्रावरुन प्रस्तावित भुखंड/इमारत कोणत्या विकास योजना आराखड्यात आहे, हे स्पष्ट होते. महानगरपालिका, विकास योजना आराखड्यातील असल्यास, जमीन मालकाकडुन अभिप्राय मागविणे अपेक्षित नाही. परंतु भुखंड सिडको विकास योजना आराखड्यातील असल्यास, सिडको व महानगरपालिका यांचा हस्तांतरण

करारनाम्यानुसार सिडको कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे. तसेच सिडको अधिसुचित क्षेत्रातुन वगळलेल्या भागासाठी सिडको कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नाही.

**स.पालिका सदस्य श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे (प्रभाग क्रमांक-१०२)**

**प्रश्न क्रमांक ३७६:-**

मा.आयुक्त साहेबांनी आपण दिलेले आश्वासन कचराकुंडी तुमच्या वॉर्डामध्ये देण्यात येईल दिड महिना झाला तरीही दिलेले आश्वासन पूर्ण झाले नाही.

**उत्तर:- वॉर्ड अधिकारी (वॉर्ड-फ),महानगरपालिका औरंगाबाद.**

वॉर्ड क्र.१०२, कबीरनगर येथे ११ लिटरचे कचरा बिन देण्यात आले. मा.आयुक्त यांनी दिलेल्या आदेशानुसार संबंधित वॉर्डात कचरा कुंडी देण्यात आलेली आहे.

**प्रश्न क्रमांक ३७७:-**

समांतर जलवाहीनी यांनी माझ्या वॉर्डात अर्धवट काम करुन चार महिने झाले आहे. आणि ड्रेनेजचे पाणी देखिल पिण्याच्या पाण्यात येत आहे.

**उत्तर:- कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा),महानगरपालिका औरंगाबाद.**

याबाबतीत कन्सेशनर यांचेकडे विचारणा केली असता खालीलप्रमाणे खुलासा प्राप्त झाला. सदरील ठिकाणी मलनि:सारण वाहिनी व जलवाहिनी मध्ये कमी अंतर असून नागरीकांच्या नळजोडण्या नाली मधून गेलेल्या आहेत. दुषित पाणी पुरवठा तक्रार निवारणाचे काम करण्यात आले तथापि, वरील परिस्थितीमुळे जलवाहिनी बदलुन नवीन डीआयके जलवाहिनी टाकणे गरजेचे आहे. पाईप उपलब्ध झाल्यानंतर दुषित पाणी पुरवठा तक्रार पाईप उपलब्ध झाल्यानंतर दुषित निवारणासाठी प्रथम प्राधान्याने जलवाहिनी बदलण्याचे काम हाती घेण्यात येईल.

**प्रश्न क्रमांक ३७८:-**

वॉर्डात ठिकठिकाणी रात्री लाईट नसल्यामुळे अनेक ठिकाणी अंधार आहे.

**उत्तर:- अप्राप्त.**

**प्रश्न क्रमांक ३७९:-**

मा.आयुक्त साहेब मागील पंचवार्षीक मध्ये झालेल्या कामाची यादी/माहिती आपण वेबसाईटवर टाकलेली आहे त्याबाबतीत किती तक्रारी आल्या आहेत? व किती कामाची आपण चौकशी केली आहे? त्यांची आम्हाला माहिती देण्यात यावा.

**उत्तर:- अप्राप्त.**

**प्रश्न क्रमांक ३८०:-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचा ठराव झालेला आहे त्याचे आजपर्यंत का बसविण्यात आला नाही?

**उत्तर:- उपअभियंता (वार्ड-अ),महानगरपालिका औरंगाबाद.**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा बसविणेसाठी आर्थीक तरतुद उपलब्ध नाही. तरतुद उपलब्ध झाल्यास प्रशासकीय मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**स.पालिका सदस्या श्रीमती सरवत बेगम आरेफ हुसैनी (प्रभाग क्रमांक-२४)**

**प्रश्न क्रमांक ३८१ ते ३८३:-**

**उत्तर:- कार्यकारी अभियंता (वार्ड-अ,क,ड),महानगरपालिका औरंगाबाद.**

| प्र. क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ३८१ | वर्क ऑर्डर झालेले स्पिल चे कामे आजपर्यंत सुरु झाले नाही. वॉर्ड क्र.२४, | वार्ड क्र.२४ मध्ये पुर्न डांबरीकरण करणे या कामासाठी ठेकेदाराला २% पत्र देण्यात आलेले |

| | | |
|---|---|---|
| | शहाबाजार मध्ये अर्थसंकल्पा प्रमाणे कार्यदेश देण्यात आलेले स्पिल चे कामे कधी सुरु करणार? | आहे. तसेच तीन ठिकाणी स्थळ बदल करण्याचे प्रस्तावीत केल्यानुसार पाहणी करुन सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. अंदाजे या महिन्या अखेर पर्यंत सदरील कामे सुरु करण्यात येईल. तसेच कार्यादेश दिलेले कामे ही आहे, फेब्रुवारी अखेर सुरु करण्यात येईल. |
| ३८२ | विनाकारण प्रभाग क अंतर्गत होणारे ए.वनची कामे का बंद करण्यात आले? वॉर्ड क्र.२४ शहाबाजार मध्ये विविध ठिकाणी फुटकळ कामाची आवश्यकता आहे. ते कामे कधी करणार? | सदर ठिकाणी फुटकळ कामे करीता ड्रेनेज देखभाल दुरुस्तीसाठी ५.०० लक्षाचे अंदाजपत्रक मंजुर आहे व सदर कामाची निविदा मागण्यात आलेली असुन प्रकरण निविदा कार्यवाही अंतर्गत आहे. या व्यतिरिक्त सदर प्रभागातील अत्यावश्यक व तातडीचे ड्रेनेज देखभाल दुरुस्तीचे कामे करुन घेण्यात येत आहेत. |
| ३८३ | वॉर्ड क्र.२४, शहाबाजार मध्ये औरंगाबाद टाईम्स कॉलनी नाला व दमडी महल नाला चाऊस कॉलनी नाला या तिन्ही ठिकाणी नाल्यामध्ये कचरा टाकण्यात आलेला आहे. वॉर्ड-क कार्यालय मध्ये लेखी पत्र दिले नाला सफाई करीता अद्याप नाला सफाई करण्यात आले नाही. सदर नालेची साफ-सफाई कधी होणार? | टाईम्स कॉलनी येथील पुला जवळील नाला सफाई (कचरा काढण्याचे काम) काही प्रमाणात नुकतेच मनपातर्फे केलेले असुन चाऊस कॉलनी व दमडी महल या ठिकाणचे नाल्या मधील कचरा काढण्याचे काम लवकरच हाती घेण्यात येईल. |

**प्रश्न क्रमांक ३८४:-**

चेलीपुरा पोलीस चौकी वॉर्ड क्र.२४ शहाबाजार ते चंपा चौक पर्यंत ५० फुटाचा हा रस्ता प्लॅन प्रमाणे आजपर्यंत झालेला नाही. या रस्ता मध्ये काही मिळकत बाधीत होत आहे. सदर रस्ता ५० फुटाचा कधी करणार?

**उत्तर:- सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद.**

रस्ता रुंदीकरणात बाधीत होणाऱ्या मिळकत धारकांना नियमाप्रमाणे मोबदला दिल्यानंतर भूसंपदाना बाबत कार्यवाही करणे बाबत मा.उच्च न्यायालयाचे आदेश आहेत. मनपाची आर्थिक स्थिती पाहता सदर विकास योजना रस्त्यामधील बाधीत मिळकत धारकांना रोख स्वरुपात मोबदला देणे महानगरपालिकेस शक्य नाही. तथापि, जे मिळकत धारक टि.डी.आर.स्वरुपात मोबदला घेऊ इच्छीतात त्यांना टि.डी.आर.स्वरुपात मोबदला देऊन भूसंपादना बाबत कार्यवाही करण्यात येईल.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद.